# बीड जिल्ह्यातील गुंडाराज संपेना! माजलगावमध्ये पुन्हा रक्तरंजित थरार रंगला!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## माजलगावमध्ये आठवडाभरात हत्याकांडाची दुसरी घटना; पोलिस प्रशासन करतंय तरी काय?

## कायदा व सुव्यवस्था धाब्यावर बसल्याने पोलिसांचा नाकर्तेपणा पुन्हा झाला सिद्ध?

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २१३ ■ सोमवार दि.२१ एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 213 ■ Monday Dt.21 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बिलाच्या कारणावरुन माजलगावात पुन्हा धारधार शस्त्राने वार करत हॉटेल मालकाचा केला खून!

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब, माजलगावमध्ये कायद्याचा धाकच राहिला नाही?

■ पोलीस प्रशासन जिल्ह्यातील गुन्हेगारी रोखण्यात अयशस्वी? ■ गृहमंत्री फडणवीस यांच्या नाकर्तेपणामुळे जिल्हा दहशतीखाली?

■ पालकमंत्री अजित पवार व स्थानिक आमदार प्रकाश सोळंके अजून किती खून झाल्यावर तुम्हाला जाग येणार?

■ कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत तर लोकांचा कायद्यावरचा विश्वास उडेल?

■ बीड जिल्ह्यात वारंवार घडणाऱ्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर?

माजलगाव । प्रतिनिधी





मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची झालेली निर्घृण हत्या, गेल्या ४ महिन्यांपासून गाजत्ये. संतोष देशमुखांचा गेलेला बळी यावरून सध्या राज्यातील वातावरण प्रचंड तापलेलं आहे. अशातच माजलगाव तालुक्यात गुंडगिरीने थैमान घातले आहे. ही घटना संपते ना संपते तोच दुसरी घटना चर्चेला उद्यान आणते. त्यातच काही दिवसांपूर्वी माजलगावमध्ये भाजप पदाधिकारी बाबासाहेब आगे यांचीही कोयत्याने सपासप वार करून हत्या झाली. त्याची दहशत अद्याप कायम असतानाच आता पुन्हा माजलगावमध्ये पुन्हा रक्तरंजित थरार रंगला आहे. ज्या हॉटेलमध्ये बसले, पोटभरून जेवले, त्याच हॉटेलचे बील देण्यावरून झालेल्या वादात हॉटेलमालक आणि त्याच्या मुलावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. या धक्कादायक प्रकारानंतर दोघावंरही रुग्णालयात उपचार सुरू होते, मात्र दुर्दैवाने यामध्ये जखमी बापलेकांपैकी, वडिलांचा मृत्यू झाला. रुग्णालयातच महादेव गायकवाड यांनी अखेरचा श्वास घेतला असून या प्रकारामुळे प्रचंड खळबळ उडाली आहे.

गायकवाड यांच्या कुटुंबावर तर दुःखाचा अक्षरशः डोंगर कोसळला आहे. घरातील कर्त्या पुरूषाचा मृत्यू झला आहे, तर त्याच कुटुबातूल दुसरा मुलगा हॉस्पिटलमध्ये जीवन-मृत्यूशी लढा देतोय, त्यामुळे गायकवाड कुटुंब प्रचंड हादरलं आहे. माजलगावमध्ये आठवड्याभराच्या आतच लागोपाठी






घडलेल्या या दोन घटनांमुळे आता बीडमध्ये आता कायदा-सुव्यवस्था नावाचा काही प्रकार उरला आहे की नाही असा प्रश्न संतप्त नागरिकांकडून विचारला जात आहे. आरोपींना तत्काल अटक करावी अशी मागणी गायकवाड यांच्या कुटुंबियांनी केली आहे.

माजलगाव शहरा पासुन ४ किमी अंतरावर नागडगाव पाटी कॉर्नर वर

पान २ वर

### ज्या हॉटेलमध्ये जेवले, त्याच हॉटेलमालकाचा घेतला जीव

मिळालेल्या माहितीनुसार, बीडच्या माजलगाव मध्ये ढाबा मालक व त्याच्या मुलावर प्राण घातक हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार रात्री उघडकीस आला होता. यामध्ये महादेव गायकवाड आणि त्यांचा मुलगा आशुतोष हे दोघे गंभीररित्या जखमी झाले होते. दोघांवर रुग्णालयात उपचार सुरू होते, मात्र महादेव यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जीव वाचू शकला नाही. रुग्णालयातच अखेरचा श्वास घेतला तर त्यांचा मुलगा अजूनही मृत्यूशी लढा देतोय.




## लिंबागणेश येथे चारचाकी दुभाजकावर आदळली

लिंबागणेश । प्रतिनिधी

अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावर लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक विद्यालया समोर आज दि.२१ सोमवार रोजी पहाटे साडे ४ च्या पाटोदा येथुन मांजरसुंभ्याकडे जाणारी सुमारास सुझुकी कंपनीची इर्टीगा चारचाकी वाहन (एम.एच.२२ यु.४७८३) दुभाजकावर आदळली.

जोराची धडक बसल्याने गाडीच्या पुढच्या भागाचा चेंदामेंदा झाला असुन गाडीचे इंजिन फुटले असुन लोखंडी दुभाजक तुटून रस्त्यावर पडलेले होते. एअर बॅग मुळे वाहनचालक आणि शेजारी बसलेल्याचे प्राण वाचले. पहाटे डुलकी लागल्याने गाडी वाहनावर आदळल्याचे गाडीमधील वाहनचालकाने सांगितल्याचे प्रत्यक्ष दर्शींनी सांगितले. संबंधित प्रकरणी नेकनुर पोलिस स्टेशनचे अधिकारी आणि लिंबागणेश पोलिस चौकीचे कर्मचारी यांना फोनवरून कल्पना दिली आहे.

### बडतर्फ पीएसआय रणजीत कासलेचा आणखी एक कारनामा उघड

## अंबाजोगाईच्या व्यावसायिकाची सहा लाखांची फसवणूक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

विविध पोलीस अधिकारी आणि राजकीय नेते यांच्या गंभीर आरोपांची राळ उडवून वादग्रस्त ठरलेल्या बडतर्फ पीएसआय रणजीत कासलेचा आणखी एक कारनामा समोर आला आहे. पीएसआय रणजीत कासले याने मैत्रीच्या नात्याचा गैरफायदा घेत तब्बल ६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप अंबाजोगाई येथील व्यावसायिक सुधीर छगनराव चौधरी यांनी केला आहे. याप्रकरणी अंबाजोगाई शहर



पोलिसात कासले याच्यावर फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सुधीर चौधरी हे अंबाजोगाई येथे कनाल इंटरप्रायजेस नावाने एनर्जी ड्रिंकची एजन्सी चालवतात. त्यांचे अंबाजोगाई शहर व ग्रामीण पोलिस स्टेशनमधील अनेक पोलिस अधिकाऱ्यांशी चांगले संबंध आहेत. याच ओळखीच्या माध्यमातून त्यांची ओळख तत्कालीन पी.एस.आय. रणजीत कासले याच्याशी झाली. चौधरी यांच्या तक्रारीनुसार, एप्रिल २०२४ मध्ये कासले याने आपल्या आईची प्रकृती खालावली आहे, असा बनाव रचून चौधरी यांच्याकडून प्रथम विविध फोन पे नंबरवरून एक लाख रुपये घेतले. यानंतर १५ एप्रिल रोजी, दवाखान्याच्या खर्चासाठी रोख रक्कम लागल्याचे सांगून

पान २ वर

## मनसेने मुंबईत भरवले प्रतिपालिका सभागृह


मुंबई : राज्याच्या कारभारावर लक्ष ठेवण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून राज ठाकरेंच्या नेतृत्वात शाडो कॅबिनेटची स्थापना करण्यात आली होती. मात्र, मनसेचा शाडो कॅबिनेट पॅटर्न फेल झाल्यानंतर आता मुंबईत मनसे कडून प्रतिपालिका सभागृह भरवण्यात येणार आहे इथे २६ एप्रिल रोजी प्रतिपालिका सभागृहाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई महानगरपालिकेचा कारभार सध्या प्रशासनाच्या वतीने चालवण्यात येतोय. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे लोकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत मनसेच्यावतीने हे प्रतिसभागृह भरवण्यात आलं आहे. त्यासाठी, मसनेचे सरचिटणीस संदीप देशपांडे यांच्याकडून मुंबईतील सर्वच राजकीय पक्षाच्या प्रमुखांना पत्र पाठवून सभागृहात उपस्थित राहण्याचे आवाहन देखील करण्यात आलं आहे.

# आता लाडक्या बहिणींच्या उत्पन्नाची होणार पडताळणी

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या निकषांनुसार चारचाकी कार असलेल्या लाडक्या बहिणींसह एकापेक्षा अधिक वैयक्तिक योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांचा शोध घेण्यात आला आहे. आता पुढच्या टप्प्यात वार्षिक अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असूनही योजनेचा लाभ घेणाऱ्या लाडक्या बहिणींची पडताळणी केली जाणार आहे. त्यानुसार अपात्र लाडक्या बहिणींचा लाभ बंद करण्याची कार्यवाही सुरू आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. निवडणूक काही दिवसांवर असल्याने ज्यांनी अर्ज केले, त्या महिलांच्या अर्जाची निकषांच्या आधारे काटेकोर पडताळणी होऊ शकली नाही. दोन महिन्यांत राज्यातील दोन कोटींहून अधिक महिलांनी या योजनेच्या लाभासाठी अर्ज केले. पण, अपेक्षेपेक्षा जास्त अर्ज आल्याने सरकारच्या तिजोरीवर अतिरिक्त ताण आला आणि अन्य योजनांचा बराच निधी या योजनेसाठी वळता करावा लागला. दुसरीकडे राज्यातील अडीच कोटींहून अधिक महिलांच्या कुटुबांचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असू शकते का, याचे उत्तर सरकार शोधू लागले आहे. आतापर्यंत १२ लाखांहून अधिक महिलांचा लाभ बंद करण्यात आला असून केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी सन्मान निधीचा लाभघेणाऱ्या लाडक्या बहिणींचा लाभ कमी केला आहे. आता शेवटच्या टप्प्यात योजनेतील लाभार्थी आधारलिंक करून 'आयकर'कडील माहितीनुसार अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिलांचा शोध राज्यस्तरावरुनच घेतला जात असल्याचेही सांगण्यात आले.



# उपसरपंच अनिल राधे कांबळे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

## मित्रपरिवारासह ब्रह्मगाव ग्रामस्थांनी विविध उपक्रमांनी केला वाढदिवस साजरा

माजलगाव | प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या ब्रह्मगाव येथील ग्रामपंचायतचे उपसरपंच अनिल राधे कांबळे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला तर त्यांच्यावर सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तर जेसीबी, क्रेनच्या साहाय्याने मोठ – मोठ्या हारानी त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

बहुजन समाजासह सर्वच समाजासाठी विविध आंदोलने, मोर्चा यातून तालुक्यामध्ये सर्वात तरुण उपसरपंच म्हणून अनिल राधे कांबळे यांची एक आगळी वेगळी ओळख झाली आहे. कुठल्याही कामासाठी हा तरुण सर्वांच्या मदतीला जाऊ धावून जातो. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला ब्रह्मगाव येथे आयोजित कार्यक्रमास मोठ्या प्रमाणावर तरुण जेष्ठ ग्रामस्थांसह नेतेमंडळींनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजलगाव मतदारसंघाचे नेते



मोहन दादा जगताप, भारतीय जनता पार्टी अ न सु मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अनिल चांदणे नगरसेवक पाथरी सचिन कांबळे नगरसेवक माजलगाव शरद यादव मानवी हक्क अभियान माजलगाव तालुकाध्यक्ष मधुकर कांबळे शाहीर युवराज ढगे वडवणीचे युवा नेते आबासाहेब राठोड गेवराई युवा नेते पप्पू बाबर छोटेवाडी माजी सरपंच प्रल्हाद दळवी शिवाजी खरात मोठेवाडी सरपंच अविनाश बोंडे संतोष राव काटकर सरपंच ऋषी कदम लहामेवाडी सरपंच मनोज वाघमारे बाबासाहेब कांबळे भानुदास कांबळे सुरेश खंडागळे शरद जाधव बाबासाहेब खरात ज्ञानेश्वर विघ्ने अभी जाधव प्रशांत जाधव परमेश्वर तांदळे विक्रांत कांबळे सुहास शिरसागर विलास लोंढे धुराजी कांबळे संकेत कांबळे बप्पा सुरवसे हनुमान सरवदे दशरथ कांबळे प्रशांत कांबळे प्रदीप कांबळे किरण कांबळे विकास कांबळे अविनाश कांबळे बबलू सोळंके सचिन राठोड अमोल आडे विशाल कांबळे अनिकेत कुशन आदित्य वाघमारे प्रविण कांबळे संतोष कांबळे ज्ञानेश्वर कांबळे किरण कांबळे प्रकाश कांबळे अजय डोईफोडे स्वप्निल उमाप सागर कांबळे शुभम मेंडके व अनिल राधे मित्र परिवाराचे सदस्य उपस्थित होते.

# प्रहार विभागीय मेळावा, पुरस्कार वितरण सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहा–हनुमंत तोंडे

किल्ले धारूर | प्रतिनिधी

प्रहार जनशक्ती पक्ष चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.बच्चु भाऊ कडू यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विभागीय मेळावा व पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पुरस्कारामध्ये संताजी, धनाजी सन्मान सोहळा दि.२३ एप्रिल २०२५ बुधवार दुपारी १ वा. ठिकाण श्री.संत एकनाथ रंगमंदिर उस्मानपुरा, संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे. विभागीय मेळावा व संताजी, धनाजी पुरस्कार वितरण सोहळ्यास बीड जिल्हय़ातील प्रहारचे सर्व पदधिकारी, कार्यकर्त्ये, शेतकरी, दिव्यांग, विधवा माता, कष्टकरी, गोरगरीब, तसेच सर्वांनी या प्रहार विभागीय मेळावा व संताजी, धनाजी पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षाचे बीड जिल्हा सरचिटणीस व किल्ले धारुर चे ता.अध्यक्ष हनुमंत तोंडे यांनी केले आहे.




# केज येथे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची संघटनात्मक आढावा बैठक संपन्न

केज | प्रतिनिधी

केज येथील शिवनेरी बंगल्यावर दि.१९एप्रिल रोजी शनिवारी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची संघटनात्मक आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सर चिटणीस अमर खानापुरे हे बीड जिल्ह्याचे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

जिल्हा काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे केज तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रवीण खोडसे, ज्येष्ठ नेते प्रवीण कुमार शेप, बाबा राजे देशमुख, बाळासाहेब ठोंबरे, महिला काँग्रेस तालुका अध्यक्ष कविता कराड, युवराज पाटील, उपेंद्र शिंदे, सारणी चे सरपंच संतोष सोनवणे, विश्वजित पाटिल, उद्धव जोगदंड, दीपक कराड, अशोक डोंगरे, नितीन धायगुडे, मारुती नवगण व काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीचे सूत्र संचालन प्रवीण कुमार शेप यांनी केले तर प्रास्तविक व केज तालुक्याचा आढावा तालुका अध्यक्ष प्रवीण खोडसे यांनी केले.

# सामाजिक सेवेचा पुरस्कार साखरे बोरगाव चे सुपूत्र अजिंक्य जगदाळे यांना जाहीर

बीड | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील साखरे बोरगाव चे सुपुत्र अजिंक्य जगदाळे हे सतत सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. गोरगरिबांच्या अडचणीत धावून जाणारा अजिंक्य जगदाळे म्हणून ओळख निर्माण झालेली आहे. याच कामाची पावती म्हणून युवा महाराष्ट्र फाउंडेशनने त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे. युवा महाराष्ट्र फाउंडेशन प्रत्येक वर्षी महाराष्ट्रातील सामाजिक कार्य तसेच अनेक क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देत सन्मान करण्यात येतो यावर्षी बीड जिल्ह्यातील साखरे बोरगाव चे सुपुत्र अजिंक्य जगदाळे यांचे सामाजिक कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना जाहीर करण्यात आलेला आहे. गावामध्ये त्यांनी अनेक गोरगरिबांना मदती तसेच अनेक प्रश्नांवर आवाज उठवत गावकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. एक तरुण आणि तडफदार नेतृत्व म्हणून अजिंक्य जगदाळे यांच्याकडे पाहिले जाते. सामाजिक कार्य असो किंवा कोणतेही कार्य असले की अजिंक्य जगदाळे हे पुढे होऊन करतात.ते करत असलेल्या कामाची दखल घेत युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कारसाठी निवड केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण २०२५ चा सन्मान पुरस्कार जाहीर केलेला आहे. यामध्ये अनेक दिग्गजांचा सन्मान सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार वितरण २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी बारा वाजता पार पडणार आहे. पुरस्कार वितरणासाठी पूजा राठोड अभिनेत्री, इलक्षी गुप्ता अभिनेत्री तानाजी चित्रपट, हसीनी सुधीर अभिनेत्री साउथ चित्रपट, रुचिरा जाधव अभिनेत्री लागीर प्रेमाचं, या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. हा गौरव बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे इतर समाजसेवकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.



पान १ वरून...

## बिलाच्या कारणावरून माजलगावात पुन्हा धारधार...

गावरान ढाबा आहे. महादेव गायकवाड हे त्याच ढाब्याचे मालक. काल संध्याकाळी ७.३० च्या सुमारास माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथील ग्राहक ढाब्यावर जेवायला आले होते. जेवणा झाल्यावर देण्यात आलेल्या बिलावरून काहीतरी वाजलं आणि ग्राहक प्रचंड संतापले. त्याच रागाच्या भरात ग्राहकांनी मागचा–पुढचा काहीच विचार केला नाही आणि महादेव गायकवाड यांच्यावर तसेच त्यांचा मुलगा आशुतोषवरही जोरदार हल्ला चढवला. त्यामध्ये दोघेही गंभीर जखमी झाले. आरोपी रोहित शिवाजीराव थावरेने आपल्या साथीदारांच्या मदतीने दोघांवर हल्ला केल्याची माहिती समोर आली.

रक्ताच्या थारोळ्यात पडलेले, गंभीर जखमी झालेले महादेव आणि आशुतोष गायकवाड दोघांनाही तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू करण्यात आले. महादेव गायकवाड यांना संभाजीनगर येथे उपचाराठी हलवण्यात होते. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने महादेव यांची प्राणज्योत मालवली. तर आशुतोषची प्रकृती अजूनही चिंताजनक असून तो जीवन–मरणाच्या उंबरठ्यावर आहे. याप्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात सहा आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

## अंबाजोगाईच्या व्यावसायिकाची सहा लाखांची फसवणूक...

रेस्ट हाऊस अंबाजोगाई येथे भेट घेऊन पाच लाख रुपये कॅश स्वरूपात घेतले. हे पैसे चौधरी यांनी आपल्या वडिलांच्या खात्यातून काढून दिले होते. या वेळी चौधरी यांच्यासोबत ऋषिकेश अण्णासाहेब लोमटे व सुरज किर्दंत हे दोन मित्रही उपस्थित होते. त्यानंतर अनेक वेळा मागणी करूनही कासले याने पैसे परत केले नाहीत. कधी लातूरमधील प्लॉट विकण्याचे तर कधी आईच्या लॉकरमधील सोनं गहाण ठेवण्याचे आश्वासन देत वेळकाढूपणा केला. अखेरीस, माझी गाडी खाजगी सावकाराकडे ठेवून मला व्याजावर पैसे मिळवून दे आणि आपला व्यवहार संपवू असा सल्ला देत त्याने फसवणुकीची परिसीमा गाठली. त्यानंतरही त्याने प्लॉट विकून पैसे देतो असा पुन्हा वेळकाढूपणा केला. वारंवार कॉल करूनही कासलेने पैसे दिले नाहीत. अखेर चौधरी यांनी अंबाजोगाई शहर ठाणे गाठून कासलेच्या विरोधात तक्रार दिली. सदर तक्रारीवरून रणजीत कासले याच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पीएसआय मनोज निलंगेकर करत आहेत. दरम्यान, विविध ठिकाणी दाखल झालेल्या गुन्ह्यानंतर अंबाजोगाईतही फसवणुकीचा प्रकार समोर आल्याने कासलेचा पाय आणखी खोलात गेला आहे. कासलेला दोन दिवसापूर्वीच बीड पोलिसांनी पुण्यातून ताब्यात घेऊन बीडला आणले आहे.

# वसुंधरा दिन – पृथ्वी आणि पर्यावरण समतोल मानवाची भूमिका

सांभाळावी वसुंधरा, त्यात आपले हित
आहे आपुली साधन संपत्ती मर्यादीत !
नको मानवा करु कोणती उधळपट्टी
पर्यावरणाचा नको ऱ्हास हव्यासापोटी !
पर्यावरणाच्या ऱ्हासाने, वेळ बदलली आता
देणे देऊ वसुंधरेचे, सांभाळु धरणीमाता !
करू अपारंपरीक उर्जेचा वापर
आणि पाण्याची काटकसर !
करू नियमित वृक्षारोपण
गरजेवर ठेवु नियंत्रण !
वसुंधरेची देखभाल हेच मानू सार्थक जीवनाचे
आपल्यावर अवलंबुन भविष्य भावी पीढीचे !

खालील माहितीमार्फत आंतरराष्ट्रीय पृथ्वी दिवस, पृथ्वीचे निर्माण आणि वैशिष्ट्ये, प्रदूषण, त्याविरुद्धच्या प्रयत्नांबद्दल तसेच मानव व विद्यार्थी वर्गाची भूमिका यांच्याबद्दल सविस्तर आणि तपशीलवार माहिती दिली आहे.

१. आंतरराष्ट्रीय पृथ्वी दिवसाचा इतिहास

उद्भव आणि प्रारंभिकता : – आंतरराष्ट्रीय पृथ्वी दिवस हा दिवस जागतिक स्तरावर पर्यावरण संवर्धनाची जाणीव जागृत करण्यासाठी साजरा केला जातो. याची सुरुवात १९७० साली अमेरिकेत झाली आणि त्यानंतर हळूहळू जगभरातील देशांनी हा दिवस स्वीकारला.

प्रेरणा व उद्दिष्टे : – औद्योगिकीकरणानंतर होणाऱ्या प्रदूषण, पर्यावरणीय दुष्परिणाम आणि जैवविविधतेच्या घट याकडे लक्ष वेधण्यासाठी हा दिवस आरंभ करण्यात आला . तो एक सामाजिक , शैक्षणिक आणि राजकीय आंदोलनाचा दिवस बनला आहे, ज्याचा उद्देश पृथ्वीच्या नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि टिकाऊ विकास सुनिश्चित करणे आहे .

२ . पृथ्वीचा उगम कसा झाला आहे ?

वैज्ञानिक सिद्धांत (नेब्युलर हायपोथेसिस) : – पृथ्वीचा जन्म सुमारे ४.५ अब्ज वर्षांपूर्वी झाला असे मानले जाते. त्यावेळी सूर्याभोवती फिरणाऱ्या धूलिकणांचा आणि वायुमंडलीय कणांचा गॅस आणि धुलीकणांचा मेघ तयार झाला, ज्यातून गुरुत्वाकर्षणाच्या परिणामस्वरूप कण एकत्र येऊन आपल्या ग्रहाची निर्मिती झाली.

पृथ्वीचे वैशिष्ट्यपूर्ण घटक :– या प्रक्रियेत पृथ्वीवर जल, वायू आणि जीवनासाठी आवश्यक असलेली ऊर्जा जमा झाली. त्याचबरोबर पृथ्वीच्या अंतर्गत उत्सर्जनामुळे पृथ्वीचा अंतर्गत तापमान आणि चुंबकीय क्षेत्र तयार झाले ज्यामुळे या ग्रहावर जीवन टिकून राहू शकले.

३. सूर्यमालेबद्दल थोडक्यात माहिती

सूर्यमालेची रचना : – सूर्यमाला ही आपली सौरव्यवस्था आहे. ज्या मध्ये सूर्य, त्याभोवतील ग्रह (जसे की बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ इ.) धूमकेतू, क्षुद्रग्रह आणि इतर अंतराळातील घटक समाविष्ट आहेत. सौरकेंद्रित व्यवस्था :– सूर्य हा एका मध्यवर्ती स्थानावर असलेला तारा आहे ज्याच्या गुरुत्वाकर्षणामुळे सर्व ग्रह त्याभोवती फिरतात.

जीवनसंवर्धनासाठी अनुकूलता : पृथ्वी हा ग्रह सूर्यापासून योग्य अंतरावर असल्यामुळे त्यावर पाणी द्रवस्वरूपात आहे आणि जीवनासाठी आवश्यक ऊर्जा प्राप्त होते.

४. २२ एप्रिल रोजी पृथ्वी दिवस का साजरा केला जातो ?

२२ एप्रिल हा दिवस १९७० मध्ये अमेरिकेत पहिल्यांदा साजरा करण्यात आला होता. या दिवशी जागतिक स्तरावर पर्यावरणाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करणे आणि प्रदूषण, जंगलतोड, जलवायु बदल अशा समस्यांवर चर्चा करणे हे उद्दिष्ट होते.

५. सध्या पृथ्वीवर अस्तित्वात असलेले देश आणि जागतिक भूगोल :– आज जगात सुमारे १९५ देश अस्तित्वात आहेत (यामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्य राष्ट्रांबरोबर दोन पर्यवेक्षक राष्ट्रांचा समावेश आहे).

जागतिक भूगोलाची रूपरेषा : पृथ्वीची रचना खंडांमध्ये विभागली जाते – आशिया, आफ्रिका, उत्तर आणि दक्षिण अमेरिका, यूरोप, ऑस्ट्रेलिया आणि अँटार्क्टिका. प्रत्येक खंडाची भौगोलिक वैशिष्ट्ये, हिवाळी आणि उष्णकटिबंधीय प्रदेश, पर्वतरांग व समतल प्रदेश यात भिन्नता आढळते.

सांस्कृतिक आणि सामाजिक विभाजन : भौगोलिक सीमा देशांच्या राजनैतिक, आर्थिक आणि सामाजिक विभाजनात महत्वाची भूमिका बजावतात.

६. पृथ्वी हा ग्रह इतर ग्रहांपासून का वेगळा आहे ?

पाणी आणि वातावरण : पृथ्वीवर द्रवपदार्थ रूपात पाणी सापडते तसेच जीवन टिकवण्यास योग्य वातावरण आहे. इतर काही ग्रहांवर पाणी नसण्याची किंवा त्याचे स्वरूप अति द्रव्यमान असण्याची शक्यता आहे. जीवनासाठी अनुकूलता : पृथ्वीच्या पृष्ठभागाचा तापमान, वायू, पाणी आणि पोषक तत्त्वे जीवनासाठी अनुकूल वातावरण पुरवतात.

भूगर्भातील क्रिया आणि चुंबकीय क्षेत्र : पृथ्वीचा आतली भागातील हालचाल आणि निर्मितीलेल्या चुंबकीय क्षेत्रामुळे हानिकारक किरणे पृथ्वीच्या पृष्ठभागापर्यंत पोहोचत नाहीत.

७. मानवी जीवनात पृथ्वीचे महत्त्व

नैसर्गिक संसाधने : पृथ्वीवर नाना प्रकारची नैसर्गिक संसाधने जसे की जल, वायू, माती, खनिजे आणि जैव विविधता उपलब्ध आहे, ज्यावर मानवी जीवनाचे सर्व पैलू अवलंबून आहेत. अन्न, पाणी, निवारा यांसारख्या मूलभूत गरजा पृथ्वीवर उपलब्ध आहेत.

सांस्कृतिक आणि आर्थिक विकास : भौगोलिक विविधता, नैसर्गिक सौंदर्य आणि परिसंस्था संस्कृती, पर्यटन, शेती, औद्योगिकीकरण आणि आर्थिक वृद्धीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

८. पृथ्वीला वाचविण्यासाठी मानवाची भूमिका

जागृती आणि शिक्षण : पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचविणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून पर्यावरण जपण्याची जाणीव वाढवणे. सस्टेनेबल प्रॅक्टिसेस : नूतनीकरणयोग्य उर्जेचा वापर, पुनर्चक्रण, कचरा व्यवस्थापन, आणि कमी प्रदूषण निर्माण करणारे उद्योग वापरणे. राजकीय व सामाजिक जबाबदारी :



सरकार, खासगी क्षेत्र आणि नागरिक यांनी पर्यावरण संरक्षणासाठी धोरणे, कायदे आणि स्वयंसेवी उपक्रम राबविणे.

९. पृथ्वीला वाचविण्यासाठी जागतिक स्तरावरील प्रयत्न

आंतरराष्ट्रीय करार आणि परिषद : क्लायमेट चेंज, पर्यावरण संरक्षण यांसाठी पॅरिस करार, कॉंफरन्स ऑफ पार्टीज सारख्या जागतिक परिषदांचा आयोजन केले जाते.

संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रयत्न : संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम आणि इतर जागतिक संघटनांनी पर्यावरण संरक्षणासाठी अनेक उपक्रम राबवले आहेत.

तंत्रज्ञानाचा वापर : शाश्वत तंत्रज्ञान आणि स्मार्ट उपाय वापरून प्रदूषण कमी करणे, ऊर्जा बचतीचे उपाय आणि पर्यावरणीय डेटाचा वापर करून धोरणे आखली जातात.

१०. पृथ्वी दिन आणि भारत

भारतामधील जागरूकता : भारतातही आंतरराष्ट्रीय पृथ्वी दिवस अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक पातळीवर पर्यावरण संरक्षणाच्या उपक्रमांमध्ये सर्व जण सहभागी होतात. वृक्षारोपण, स्वच्छता मोहिमा, जलस्रोत संरक्षण, आणि कचरा व्यवस्थापन या उपक्रमांद्वारे पर्यावरणाच्या संवर्धनासाठी कार्य केले जाते.

११. पृथ्वीला भेडसावणारे विषय :

औद्योगिकीकरणामुळे वाढलेले प्रदूषण , वनतोड , जलवायु बदल , अति जनसंख्या आणि नैसर्गिक संसाधनांची कमी ह्या काही मुख्य समस्या आहेत.

पर्यावरणीय असमानता : भौगोलिक व सामाजिक असमानता , गरिबी आणि अनियमित शहरीकरण देखील पृथ्वीवरील परिसंस्थेला धोका निर्माण करतात.

१२. विविध प्रदूषणे आणि प्रदूषण थांबवण्याचे मार्ग

वायूप्रदूषण : वाहतूक, उद्योग आणि घरगुती उपयोगापासून निर्माण होणारे धूळ व धूर ही वायुप्रदूषणाची मुख्य कारणे होत.

जलप्रदुषण : औद्योगिक कचरा, रासायनिक पदार्थ आणि प्लास्टिक कचरा ही जलप्रदुषणाची मुख्य कारणे होत.

मृदा प्रदुषण : रासायनिक खत, कीटकनाशके आणि अवैध कचरा व्यवस्थापनामुळे मातीची गुणवत्ता कमी होते.

प्रदूषण कमी करण्याच्या उपाययोजना : नूतनीकरणयोग्य ऊर्जा स्त्रोतांचा वापर (सौर, पवन, जलऊर्जा) ; पुनर्चक्रण आणि कचरा व्यवस्थापन सुधारणे; हरित तंत्रज्ञानाचा वापर आणि जागरूकता अभियान राबविणे. औद्योगिक धोरणांमध्ये सुधारणा करून पर्यावरणपूरक उपाययोजना राबवणे.

१३. महाविद्यालयीन तरुणांची भूमिका : संशोधन आणि नवकल्पना : विद्यापीठातील संशोधक आणि विद्यार्थी नवीन, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान विकसित करून प्रदूषण कमी करण्यास मदत करू शकतात. तरुण समाजमाध्यमांवर जागरूकता मोहिमा राबवून व्यापक लोकसमूहाला पर्यावरणाच्या समस्यांबद्दल माहिती देऊ शकतात. स्वयंसेवी संस्था व गटांमध्ये सहभाग घेऊन वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि इतर पर्यावरणीय उपक्रमात सक्रिय भूमिका निभावता येते.

१४. शालेय विद्यार्थ्यांनी काय करावे :– शालेय विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणाच्या मूलभूत तत्त्वांचे शिक्षण घेणे आणि त्यांचा दैनंदिन जीवनात अवलंब करणे. प्राकृतिक स्रोतांचे जपण : कमी पाणी वापरणे, कचरा कमी करणे आणि पुनर्चक्रणाचे महत्त्व समजून घेणे. शाळांमध्ये वृक्षारोपण, साफसफाई मोहीम आणि इतर सजग उपक्रम राबवून मित्रपरिवारात जागरूकता वाढवणे.

१५. सर्वसामान्य नागरिकांसाठी आवाहन :– जागृती वाढवा : पर्यावरण संरक्षणाच्या बाबतीत स्वयं शिक्षण करा, संवाद साधा आणि तुमच्या स्थानिक समुदायात बदल घडवा. दैनंदिन जीवनात ऊर्जा बचत, पुनर्चक्रण, सार्वजनिक वाहतूक वापरणे आणि हरित उत्पादने निवडण्याने मोठा फरक पडू शकतो. स्थानिक गट, स्वयंसेवी संस्था, आणि पर्यावरणीय उपक्रमांमध्ये सामील व्हा, जेणेकरून समाजात पर्यावरण संरक्षणाची जागरूकता वाढवता येईल.

१६.२०२५ सालची पृथ्वी दिवसाची थीम :– जागतिक पृथ्वी दिनाची थीम आमची शक्ती, आमचा ग्रह आहे. ही थीम नूतनीकरणक्षम उर्जा स्त्रोतांकडे स्विच करण्यासाठी आणि शाश्वत भविष्य निर्माण करण्यासाठी लोक, संस्था आणि सरकार यांच्या सामान्य जबाबदारीवर लक्ष केंद्रित करते. सस्टेनेबिलिटी : पर्यावरणीय तंत्रज्ञान, नूतनीकरणयोग्य ऊर्जा स्त्रोतांचा वापर, जलस्रोतांचे संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन यावर लक्ष केंद्रीत करणे. सामूहिक जबाबदारी : व्यक्ती, समुदाय, शाळा, महाविद्यालये आणि सरकार यांनी एकत्र येऊन पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे. उद्दिष्टांची प्राप्ती : हा दिवस लोकांना जागरूक करण्याच्या आणि दैनंदिन जीवनात पर्यावरणपूरक पद्धती अंगीकारण्यासाठी प्रेरित करण्याचा संदेश देईल. देशभरातील उपक्रम, कार्यशाळा, संवाद सत्रे आणि सामाजिक माध्यमांवरील मोहिमा ह्या थीमच्या आधारे राबविल्या जातील.

अनादी काळापासून, निसर्गाने मानवांना प्रेरणा आणि उन्नती दिली आहे आणि अनेक महान कवींनी शब्दांद्वारे त्यांची श्रद्धांजली वाहण्याचा प्रयत्न केला आहे. डॅफोडिल्सने भरलेल्या भूमीच्या स्वर्गीय दृश्यापासून ते पक्षी आणि भुंग्यांच्या सौंदर्यापर्यंत, साहित्यातील काही महान कवींनी आपल्या निसर्गाचे सौंदर्य आणि आनंद त्यांच्या कवितेत टिपण्याचा प्रयत्न केला आहे .

I wandered lonely as a Cloud
That floats on high over Vales and Hills,
When all at once I saw a crowd,
- host of golden Daffodils;
Beside the Lake, beneath the trees,
Fluttering and dancing in the breeze.
----- William Wordsworth

मी ढगासारखा एकटा भटकलो – विल्यम वर्ड्सवर्थ

विल्यम वर्ड्सवर्थ यांची 'आय वँडर्ड लोनली अ क्लाउड' ही गीतात्मक कविता निसर्गाचा शोध घेण्याच्या आनंदाचे वर्णन करते. १८०२ साली कवी आणि त्याची बहीण डोरोथी यांनी सुंदर डॅफोडिल्सचा लांब पट्टा पाहिला. तेव्हाच्या एका वास्तविक घटनेपासून प्रेरित ही कविता आहे. असेच सुंदर चित्र या पृथ्वीतलावर नेहमी राहो, ही अपेक्षा..

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

# सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय आहे : महंत शिवाजी महाराज

# मराठवाड्याच्या महत्वाच्या प्रश्नासाठी पुढचा राजकिय प्रवास : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

नवगण राजुरी । प्रतिनिधी

संपत्ती कमावण्यापेक्षा मुलांवर चांगले संस्कार करा, आजची मुले ही उद्याची राष्ट्राची संपत्ती आहे. मराठवाडा ही संतांची भुमी आहे. सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय असल्याचे प्रतिपादन श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी केले. तर जरूड ते सिरसाळा आणि शिरापूर फाटा ते सौताडा या दोन रस्त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला असून तो मंजूर झाला आहे. त्याची निविदा प्रक्रिया होऊन हा रस्ता देखील पूर्ण होणार असून या रस्त्यामुळे दळणवळण सुविधा सुलभ होणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

माजी जि.प.सदस्य स्व.सौ. सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त नवगण राजुरी येथे पंचदिनात्मक किर्तन महोत्सवाचे आयोजन आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या महोत्सवाची सांगता श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, ह.भ.प. शिवाजी महाराज येवले, ह.भ.प. नारायण महाराज डिसले, मकरंद महाराज, रविंद्र क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, डॉ.विठ्ठल क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर, संपादक विजयराज बंब, अजित वरपे, बळीराम गवते, सुधाकर मिसाळ, सुभाष क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.



काल्याच्या किर्तनासाठी महंत शिवाजी महाराजांनी संत तुकाराम महाराजांचा अभंग घेतला. किर्तन सांगताना महाराज पुढे म्हणाले की, आई या शब्दात मोठी ताकत आहे, आई हा व्यापक शब्द आहे, लाख गुन्हे माफ करणारे न्यायालय म्हणजे आई आहे. निस्वार्थीपणे मुलांवर प्रेम करणारी आई आहे. चांगली मुले जन्मण्यासाठी आई-वडीलांची सुध्दा पुण्याई असावी लागते. शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी आई-वडीलांच्या पुण्याईने भगवंत रत्न जन्माला येतात. आई तुझे थोर उपकार असे कविने म्हटले आहे. आई माझी मायेचा सागर आहे. लाभाविना प्रेम करणारी आई आहे, स्व.रेखाताईंनी राम नामाचा जप केला, अनंत कोटी पुण्य घडलेले आहे. रेखाताईंनी उत्तम किर्ती केलेली आहे ज्यांनी उत्तम किर्ती केली त्यांचे असे सोहळे साजरे होतात. भक्तीच्या मंडपामध्ये काय करायचे आणि काय करायचे नाही हे शिकायचे आहे. जसे कर्म केले तसे फळ मिळते जसं पेराल तसं उगवतं भगवान स्वतःहून भक्ताकडे जातो अशी भक्ताची भक्ती असावी. आपल्यावर राज आल्यावर राज दिलच पाहिजे असे सांगून आत्महत्या करू नका आलेल्या संकटाला सामोरं गेलं पाहिजे स्त्री-भ्रूण हत्या करू नका. सर्वांनी एकत्र येऊन केलेली क्रिया याला काला म्हणतात असे त्यांनी सांगितले.

यावेळी पुढे बोलातना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, भविष्याचा विचार करून मराठवाडच्याच्या पाणी प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा गरजेचा आहे, समुद्राला वाहून जाणारे पाणी हे जर आपल्याला उपलब्ध झाले तर पाण्याचा प्रश्न सुटू शकतो, पुढच्या पिढीसाठी आतापासून विचार करून प्रश्नांची सोडवणूक महत्वाची आहे, आगामी काळात अशाच प्रश्नासाठी पुढचा प्रवास करावा लागणार आहे. अध्यात्मातील राजुरीचे वैभव महंत अमृत महाराज आहेत. स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी स्व.काकू-नाना पासून पोकळी निर्माण झाली आहे. नियती कोणाला सोडत नाही. अध्यात्मिक क्षेत्रात स्व.रेखानी काम केले. रेखा आमच्या परिवारातील एक सदस्य होती. नवगण राजुरी आणि या भागात गणपतीचे आशिर्वाद आहेत जसे महाराष्ट्रात अष्टविनायक तसेच महात्म्य या परिसरात आहे. देवांचा दैत्यांवर विजय झाला असं त्या काळातल्या कथा आहेत. संघर्ष हा प्रत्येकाच्या जीवनात आहे भौतिक सुखासाठी माणूस झगडत असतो. या महिन्यात ठिकठिकाणी नारळी सप्ताह, वार्षिक सप्ताह होत आहेत त्यामुळे भक्तीचा महापूर आला आहे. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराजांनी जाती तोडा समाज जोडा मन, माणूसकी जपा असे सांगून अध्यात्माचा संदेश दिला आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ.अरूण भस्मे, रामदास हांगे, आसाराम औसरमल, सुनिल पांगारकर, ॲड.बालाप्रसाद करवा, संजय मचाले, अशोक रोमण, सुर्यकांत रायते, तानाजी आगळे, संजय कुलकर्णी, जीवन जोगदंड, प्रा.आबासाहेब हांगे यांच्यासह भाविक-भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## राज्याचे प्रमुख नेत्यांचे उपस्थितीत २७ एप्रिल रोजी समाजवादी पक्षाची जिल्हा आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी

समाजवादी पक्ष हे देशातील प्रमुख पक्ष पैकी एक पक्ष असून समाजवादी पक्षाने नेहमी लोकशाहीची जतन करण्यासोबतच नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्राथमिकता दिली आहे येणारे काळात होणारे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी निमित्ताने येत्या २७ एप्रिल रोजी समाजवादी पक्षाचे जिल्हा कार्यालय बशीर गंज या ठिकाणी जिल्हा आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे ही बैठक राज्याचे प्रमुख नेत्यांचे उपस्थितीत आयोजित करण्यात आली असून या दिवशी जिल्हा कार्यकारणी व विविध पदावर नियुक्ती सुद्धा करण्यात येणार आहे अशी माहिती समाजवादी पक्षाचे जिल्हा अध्यक्ष मोहम्मद खमरूल ईमान यांनी दिली आहे.



२७ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता होणारी बैठकीत राज्याचे उपाध्यक्ष डॉक्टर जोशी पाटोदकर नांदेड, प्रदेश महासचिव परवेज सिद्दिकी नागपूर, प्रदेश महासचिव शेख अनिस अहमद पुणे, डॉक्टर शेख अब्दुल रौफ औरंगाबाद, प्रदेश सचिव एडवोकेट शिवाजी कांबळे व इतर मान्यवर उपस्थित राहणार असून या बैठकीत गेल्या एक वर्षाचे कामकाजाचा आढावा घेऊन येणारे काळात होणारे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकी संदर्भात महत्वाचे निर्णय घेतले जाणार आहे तसेच राज्याचे मान्यवरांचे उपस्थितीत अनेक प्रवेश व पद नियुक्ती करण्यात येणार असून या बैठकीत जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा अध्यक्ष खमरूल ईमान यांनी केले आहे.

## सरपंच ॲड.गणेश मोरे यांना महाराष्ट्रभूषण सन्मान पुरस्कार जाहीर

### बीड जिल्ह्यात जनतेतील कमी वयात सरपंच झालेला म्हणून ओळख

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वडगाव कळसंबर येथील सरपंच मा. ड. गणेश आसाराम मोरे यांनी गावातील विविध विकास कामे केले आहेत. आदर्श सरपंच म्हणून त्यांची परिसरात ओळख निर्माण झाली आहे. गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणारा हा गणेश सतत लोकांच्या सेवेत असतो.

ॲड. गणेश मोरे यांना महाविद्यालयीन जीवनापासून सामाजिक कार्य करण्याची आवड असून ते नेहमीच समाजकार्यासाठी अग्रस्थानी असतात. गावचे प्रथम नागरिक म्हणून ते उत्तमपणे आपले कार्य करत असल्याने ग्रामस्थ त्यांच्या कार्यपद्धतीवर समाधानी आहेत. ते करत असलेल्या कामाची दखल घेत युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कारसाठी निवड केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी महाराष्ट्र भूषण २०२५ चा सन्मान पुरस्कार जाहीर केलेला आहे. यामध्ये अनेक दिग्गजांचा सन्मान सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार वितरण २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी बारा वाजता पार पडणार आहे.



पुरस्कार वितरणासाठी पूजा राठोड अभिनेत्री, इलक्षी गुप्ता अभिनेत्री तानाजी चित्रपट, हसीनी सुधीर अभिनेत्री साउथ चित्रपट, रुचिरा जाधव अभिनेत्री लागीर प्रेमाचं, या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. ॲड. गणेश मोरे यांची सरपंच पदाची दुसरी टर्म असून जनतेतील सरपंच पदाच्या पहिल्या निवडणुकीमध्ये गणेश मोरे बीड जिल्ह्यातील कमी वयात पहिल्या वेळेस जनतेतून सरपंच झालेला मुलगा म्हणून ओळख निर्माण झालेली आहे. आता सध्या त्यांच्या मातोश्री सुशाला आसाराम मोरे या सरपंच आहेत. गणेश मोरे यांची ओळख मेटे साहेबांचा कार्यकर्ता म्हणून निर्माण झालेली आहे. पुरस्कार जाहीर झाल्यामुळे गणेश मोरे यांचे अभिनंदन आणि कौतुक परिसरातून नव्हे तर बीड जिल्ह्यामधून होत आहे, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होताना पाहायला मिळत आहे.

स्वच्छतेच्या उद्देशाने नाली बांधकाम, गटारी योजना, प्रवाहाप्रमाणे नळ पाणीपुरवठा योजना राबवली, गावच्या स्वच्छतेच्या अनुषंगाने गावातील प्रत्येक घरासमोर शोषखड्डे नियोजन करण्यात आले आहे. गावामधील पाणी असेल ते त्याच ठिकाणी मुरून पाणी पातळी वाढण्यासाठी मदत होते यासाठी त्यांनी अनेक विविध विकास कामे तसेच योजना सुद्धा राबवल्या आहेत. आदर्श ग्रामपंचायत त्यांनी निर्माण केलेली आहे. हा गौरव बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद असून, इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी, सरपंचासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

## मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे अंधापुरी घाट येथे गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या कृपेने व वै ह.भ.प गिरी महाराज व ज्ञानेश्वर माऊली, सुदाम देव महाराज, गुरुवर्य शांती ब्रह्म रामहरी बाबा यांच्या कृपाशीर्वादाने व ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे व महादेव महाराज (तात्या) यांच्या मार्गदर्शनाखाली व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने वार सोमवार दि. २१/४/ २०२५ रोजी मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सात दिवस चालणाऱ्या या सप्ताह निमित्त गावामध्ये रोज वेगवेगळ्या नामांकित कीर्तनकारांचे अमृततुल्य असे किर्तन सेवा होणार आहेत तसेच भजन, प्रवचन, हरिपाठ व हरीजागर असे कार्यक्रम होणार आहेत.

अखंड हरिनाम सप्ताह निमित्त गावामध्ये रोज गावकऱ्यांच्या वतीने व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने सप्ताह निमित्त महापंगतीचे आयोजन करण्यात आले असून रोज सकाळ व संध्याकाळ गावामध्ये वेगवेगळ्या महापंगती होणार असून परिसरातील भावीक भक्तांनी, नागरिकांनी व गावकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने याचा लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अखंड हरिनाम सप्ताह निमित्त सोमवार दि.२८/ ४/ २०२५ रोजी श्री गुरुवर्य ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती बंकट स्वामी संस्थान निनगुर, आळंदी, पंढरपूर) यांचे सकाळी ११ ते १ या वेळेत अमृततुल्य असे काल्याचे किर्तन होणार असून नंतर लगेचच महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे तरी परिसरातील जास्तीत जास्त भाविक भक्तांनी व नागरिकांनी तसेच गावकऱ्यांनी काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे गावकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## विजय स्पोर्ट्स क्रीडा अकॅडमीचे वतीने उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील खेळाडूंसाठी विजय स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने विविध खेळांच्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अकॅडमीचे संचालक विनोद गुंड यांनी दिली आहे.



विजय स्पोर्ट्स अकॅडमी च्या वतीने १ मे २०२५ ते १ जून २०२५ या दरम्यान एक महिन्याचे फुटबॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, योगा, बुद्धीबळ, तायक्वांदो खेळाचे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण आयोजन केले आहे. या शिबिरामध्ये शास्त्रशुध्द पध्दतीने क्रीडाप्रशिक्षण दिले जाणार असून या शिबिरात १४ वर्षा खालील मुला-मुलींना प्रवेश दिला जाणार आहे. हे शिबिर स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या मैदानावर सकाळी ६ ते ८ या वेळेत होणार आहे. या शिबिरात केज तालुक्या तील खेळाडूनी सहभाग व्हावे असे आवाहन विजय स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने क्रीडा संयोजक विनोद गुंड यांनी केले आहे.

## केज येथे १ मे रोजी रोटरी क्लबच्या वतीने भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन

केज । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रोटरी क्लब ऑफ केज यांच्या वतीने केज शहर व तालुक्यातील कुशल व गुणी कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देण्या करिता येत्या दि.१ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून केज शहरातील हनुमान मंदिर (वकिलवाडी) समोरील प्रांगणात सायंकाळी ठीक ६ वाजता भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत केज तालुक्यातील सर्व गुणी कलाकारांना आपली कला दाखवण्याची संधी दिली जाणार आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कलाकारांना दि.२८ एप्रिल रोजी आपल्या डान्स ची रंगीत तालीम द्यावी लागेल.

यामध्ये निवड होणाऱ्या कलाकारांनाच दि.१ मे रोजीच्या स्पर्धेत संधी दिली जाईल. रंगीत तालीम २८ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता भोसले ब्रिलिअन्स क्लासेस केजच्या हॉल मध्ये पार पडेल. ही स्पर्धा चौथी ते सातवी व आठवी च्या पुढेखुला गट अशी दोन गटात होणार आहे. भाग घेऊ इच्छिणाऱ्या सर्व कलाकारांना आपली नावे व रंगीत तालीम २८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत देता येतील. त्यानंतर येणाऱ्या नावांचा विचार केला जाणार नाही. इच्छुकांनी आपली नावे विद्यमान अध्यक्ष रो प्रकाश कामाजी (व्यंकटेश ज्वेलर्स, कानडी रोड - ९८६०६५२४५४ सचिव आनंद तरकसबंद (सहशिक्षक- ९४०४६९७४७५, ०८६६८४४७७४४, संस्थापक अध्यक्ष हनुमंत भोसले ९४२३७३३८८८, प्रोजेक्ट चेअरमन रो श्रीराम देशमुख सहशिक्षक- ९०७५७५४४४४ यांच्याकडे नोंदणी करावी.

## केजच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्वेसर्वा हारूनभाई इनामदार बांधणार दि.२२ एप्रिल रोजी मंगळवारी अजितदादांचे घड्याळ हाती

# इनामदारांच्या माध्यमातून केजमध्ये अजितदादांची राष्ट्रवादी होणार आता भक्कम

केज । प्रतिनिधी

केजच्या राजकीय परिघावर मोठी घडामोड होताना दिसत आहे. येत्या २२ एप्रिल रोजी केजमध्ये मोठा राजकीय भूकंप होत असून केजच्या नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे संस्थापक हारूणभाई इनामदार यांनी बीड जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक परिस्थिती चे अवलोकन करत केजशहराच्या सर्वांगीण विकासासाठी उप मुख्यमंत्री व अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे घड्याळ हाती बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या निर्णयामुळे केजशहराचे व बीड जिल्ह्याचे राजकीय समीकरण बदलणार आहे.

केजच्या नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्वेसर्वा हारुणभाई इनामदार यांचा पक्ष प्रवेश सोहळा मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी मुंबई येथील वानखेडे स्टेडियम येथे होणार आहे. केज शहराची सत्ता प्रामुख्याने जनविकास परिवर्तन आघाडीकडे आहे. जनविकास परिवर्तन आघाडीच्या नगराध्यक्ष सीताताई बनसोड व संस्थापक हारूणभाई इनामदार यांच्या नेतृत्वाला केज शहराने पसंती दिलेली आहे. दि.१४ फेब्रुवारी २०२२ साली नगराध्यक्ष पदाची सूत्र स्वीकारल्यानंतर केज शहरात विकासाचा झपाटा लावलेला आहे. बीड जिल्ह्यातील पाच नगरपंचायती पैकी क्रमांक एकची नगर पंचायत केज नगर पंचायत ठरली आहे. गेल्या तीन वर्षात विकास कामात आपली आगळीवेगळी ओळख निर्माण केली आहे. केज शहराला नवी ओळख मिळवून देण्यात हारूणभाई इनामदार यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. गेल्या तीन वर्षात स्वच्छतेच्या बाबतीत असेल, पाणी पुरवठ्याच्या बाबतीत असेल किंवा गावातील विकासाच्या बाबतीत असेल स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. जन सामान्यांचा विश्वास संपादन करून सामाजिक व राजकीय पटलावर स्वतःचे स्थान निर्माण केले आहे.



केज शहराचा कायापालट करण्यासाठी धर्म निरपेक्ष पक्ष आणि नेतृत्व असणे आवश्यक आहे म्हणून केजच्या नगराध्यक्ष सीताताई बनसोड व हारुणभाई इनामदार यांनी योग्य असा राजकीय पर्याय निवडण्याचा अधिकार आपल्या तमाम कार्यकर्ता वर्गाकडे सुपूर्द केला होता. अखेर सर्वानुमते इनामदार यांनी विकासासाठी सत्ता आणि सत्तेसाठी विकास हे ब्रीद समजून घेत उपमुख्यमंत्री व राज्याचे अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने येत्या मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी मुंबई येथे वानखेडे स्टेडियम या ठिकाणी नगराध्यक्ष सिताताई बनसोड, हारूणभाई इनामदार यांचा पक्षप्रवेश सोहळा होणार आहे. या पक्ष प्रवेश सोहळयासाठी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, ना. दिलीप वळसे पाटील, आ.धनंजय मुंडे, आ. विजयसिंह पंडित, आ. प्रकाशदादा सोळंके, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पक्ष प्रवेशाची जोरदार तयारी हारुण भाई इनामदार समर्थकांकडून केली जात आहे.

शेकडो गाड्यांचा ताफा यात असणार आहे. हारुण भाई इनामदार यांच्या पक्षप्रवेशामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय समीकरण बदलणार आहे. राष्ट्रवादीत अजित दादा गटाकडे प्रभावी व वक्तृत्व संपन्न मुस्लिम चेहरा नाही म्हणून हारूणभाई इनामदार यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला याचा फायदा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी मध्ये होणार आहे. बीड जिल्ह्यात हारुणभाई इनामदार यांनामानणारा मुस्लिम मतदार मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या व्होट बँकेला इनामदार यांच्या माध्यमातून फायदा होणार आहे. आगामी काळात राष्ट्रवादीची बुलंद तोफ म्हणून इनामदार यांच्याकडे पाहिले जाणार आहे शिवाय राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने सुद्धा तेवढी ताकद हारूणभाई इनामदार यांना देणे गरजेचे आहे.

सध्या जनविकास परिवर्तन आघाडीच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व संस्थापक हारुणभाई इनामदार तसेच केज नगर पंचायत मधील जनविकास आघाडीचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामीण भागा तील कार्यकर्ते, पदाधिकारी अनेक गावचे सरपंच, उपसरपंच, सेवासहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हाइस चेअरमन या शिवाय जिल्हाभरातील असंख्य कार्यकर्ते हारुणभाई इनामदार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत. हारुणभाई इनामदार यांच्या पक्षप्रवेशामुळे अजितदादांची राष्ट्रवादी आणखी भक्कम होणार असल्याची शक्यता राजकीय वर्तुळातून व्यक्त केली जात आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका रस्त्याच्या दरम्यान यु टर्नच नाही

## समोर कार्यालय असुन किलोमीटरचा वळसा; दुभाजक ओलांडण्याची शर्यत लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील २ किलोमीटरचे काम अंतिम टप्प्यात असुन सध्या दुभाजक उभारणीचे काम सुरू आहे. या रस्त्यावर एक किलोमीटर अंतराच्या पल्ल्यात दोन्ही बाजूंनी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय, सामाजिक न्याय भवन, तहसील, असे २५ हुन अधिक शासकीय कार्यालये आहेत. सदरील मार्ग वर्दळीचा असल्याने ठिकठिकाणी वाहनांना वळण घेण्यासाठी यु टर्न आवश्यक आहे. मात्र छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका दरम्यान कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग राजेंद्र भोपळे यांनी तांत्रिक नियमांकडे बोट दाखवून मनमानी कारभार करत शासकीय कार्यालयात येणाऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरू आहे.**

यु टर्न नसल्याने नागरीकांना समोर कार्यालय असुनही किलोमीटरचा वळसा मारावा लागणार आहे. स्वत:चे दुचाकी किंवा चारचाकी वाहन असणाऱ्यांना हा फेरा असला तरी सामान्य नागरिकांना रिक्षातुन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसील, जिल्हा सत्र न्यायालय याठिकाणी पुर्वीप्रमाणेच दुभाजकांमध्ये यु टर्न ठेवावेत या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२१ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दुभाजक ओलांडण्याची शर्यत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी बीड




शिवकुमार स्वामी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे, मुबीन शेख, सुदाम तांदळे, मुस्ताक शेख, बाजीराव ढाकणे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड शहराध्यक्ष आप सादिक इनामदार आदींनी सहभाग घेतला.

**नगर रोडवरील कार्यालये**

दक्षिण बाजू : जिल्हा आरोग्य परीक्षण केंद्र, शासकीय विश्रामगृह, पंचायत समिती, महिला आर्थिक विकास महामंडळ, बाल संरक्षण अधिकारी कार्यालय, चंपावती क्रीडा मंडळ उत्तर बाजु : जिल्हा क्षयरोग कार्यालय, जिल्हा परिषद कन्या शाळा, माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय, तालुका न्यायालय, कौटुंबिक न्यायालय, जिल्हा जात पडताळणी कार्यालय, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मकार महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ, दिव्यांग कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद समाज कल्याण कार्यालय, सहाय्यक आयुक्त सामाजिक न्याय विभाग, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हा पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा मुद्रांक अधिकारी कार्यालय, नोंदणी निबंध कार्यालय, जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांची निवासस्थाने

**२ वर्षांपासून काम रखडलेले; कंत्राटदारास १ कोटीचा दंड परंतु सुधारणा नाहीच**

बीड ते अहिल्या नगर राष्ट्रीय महामार्गावरील बीड शहरातील २ किलोमीटरचे काम २ वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत आहे. मार्गावरील खडी, धुरळा उडुन वाहनचालकांना त्रास होत आहे. कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे नागरीकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. अपघाताला निमंत्रण मिळत आहे. सामाजिक संघटना, नागरीकांच्या तक्रारी नंतर जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भाने कठोर भूमिका घेऊन या कामाची पाहणी करून महामार्ग प्राधिकरण आधिकाऱ्यांना पत्र देऊन संबंधित कंत्राटदारास १ कोटीचा दंड ठोठावला आहे. सद्यस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, नगरनाका, बालेपीर याठिकाणी खड्डे खोदून ठेवलेले असुन काम आजही अपुर्ण असुन संथगतीने काम सुरू असुन कंत्राटदाराच्या कामात कोणतीही सुधारणा झालेली नाही.

---

### अनिल जगताप यांच्या उपस्थितीत असंख्य तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

# एकनाथजी शिंदे सर्वसामान्यांचा आधार : अनिल जगताप

बीड । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे आणि संसदरत्न खा.डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू दादा गायकवाड यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ, सूरज गायकवाड, अमित गायकवाड,



शुभम आखाडे, संदेश सावंत, विशाल उबाळे, दामोदर डोळस, किशोर जाधव, भरत जाधव, सुमित जाधव, वसंत जाधव, प्रशांत दुधाळ, प्रितम दुधाळ, दिपक भराटे, महेश नेवडे, गोपाळ आखाडे, सुशील दुधाळ, औदुंबर दुधाळ, नितिन शेवाळे, दत्ता राऊत, विनोद गायकवाड, रवि दुधाळ, अविनाश कुऱ्हाडे, सोहेल गायकवाड, विनोद गायकवाड, तेजस नाळे, सोनू सुरवसे, अविष्कार दुधाळ, अनय गायकवाड, राम अंकुशे, सचिन अंकुशे, श्याम अंकुशे, प्रतिक दुधाळ, निवास रोकडे, संघर्ष डोंगरे, सौरभ राऊत, बबलू घुमरे, अतुल जगताप, शैलेश आगलावे, दीपक बोबडे यांनी काल दि.१९ रोजी दुपारी १ वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोडबीड येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू दादा गायकवाड यांनी प्रत्येकाच्या हाती भगवा झेंडा देऊन सर्वांचे शिवसेनेत स्वागत केले.

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते बाळासाहेबांच्या विचारांचा रथ यशस्वीपणे ओढत असून त्यांनी आपल्या मुख्यमंत्री काळात सामान्य जनतेसाठी अनेक हितदायी योजनांची उभारणी करत स्वतःला सिद्ध केले आहे. सर्वसामान्यांसाठी त्यांनी अनेक हितदायी योजना उभारल्या. बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार असणारे आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांची ताकद वाढवण्याकरिता आपण सर्व जाती-धर्मातील कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे अशा भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात मांडल्या तर अठरा पगड जातीची वज्रमुठ एकनाजी शिंदे साहेबांची ताकद वाढविण्यासाठी कामी येणार असल्याचे मत शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू दादा गायकवाड यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शिवसेना, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

### पंचवीस घरांच्या पळसखेड ग्रामस्थांची

# भगवानगडाला २२ लाख रुपये देणगी जाहीर

## करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

भगवानगड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री



बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे पळसखेड (ता.जि.जालना) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही २२ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

---

# स्व. बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबियांना ना. पंकजाताई मुंडेंनी दिला मायेचा आधार!

## जिल्हाध्यक्षामार्फत मदत सुपूर्द; पत्नीला नोकरी देण्याचा दिला शब्द

बीड । प्रतिनिधी

भाजपचे जिल्हा विस्तारक स्व. बाबासाहेब आगे यांच्या कुटुंबियांशी राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी दुपारी दूरध्वनीवरून संवाद साधला. आगे कुटुंबाला आर्थिक मदत करत त्यांच्या पत्नीला नोकरी मिळवून देण्याचा शब्द त्यांनी दिला. बीडच्या पुढील दौऱ्यात आपण आगे परिवाराची प्रत्यक्ष भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ना.पंकजाताई मुंडे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत घाटशीळ पारगाव येथे नारळी सप्ताहात उपस्थित होत्या. नियोजित दौर्यानुसार त्या किट्टी आडगाव येथे जाऊन स्व. बाबासाहेब आगे यांच्या परिवाराला भेटणार होत्या परंतू अचानक मिटिंगसाठी मुंबईला जावे लागल्याने त्यांच्या सूचनेनुसार भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी भाजपच्या पदाधिकाऱ्यां समवेत आगे परिवाराची त्यांच्या घरी जावून भेट घेतली व ना. पंकजाताईंनी दिलेली मदत सुपूर्द केली. यावेळी ना.



पंकजाताईंनी दूरध्वनीवरून आगे यांचे आई वडील तसेच पत्नी व लहान मुलीशी संवाद साधत त्यांना धीर दिला व सांत्वन केले. पत्नीला नोकरी देण्याचा शब्द देत तुमच्या काळजी करू नका, मी तुमच्या पाठिशी सदैव राहील असा धीर त्यांनी यावेळी दिला. ना. पंकजाताईंनी दिलेल्या या मायेच्या आधाराने आगे परिवाराला अश्रू अनावर झाले होते.

भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, तालुकाध्यक्ष अरूण राऊत, नवनाथ शिराळे, रामराव खेडकर, रामदास बडे, डॉ. अशोक तिडके, प्रकाश सुरवसे, श्रीकांत सानप आदींसह पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

---

# समविचारी भुमिका आणणाऱ्या संघटना व राजकीय पक्षांसोबत करणार आंदोलन

## बीड शहर बचाव मंच जनसुरक्षा कायद्याविरुद्ध रस्त्यावर उतरणार : नितीन जायभाये

बीड । प्रतिनिधी

दि.२२ एप्रिल रोजी डाव्या विचारसरणीचे सर्व पक्ष व सामाजिक संघटना एकत्र येऊन जण सुरक्षा कायद्याच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन करणार आहेत. अशा सर्व समविचारी राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांसोबत 'बीड शहर बचाव मंच' या आंदोलनामध्ये सहभागी आहे. 'खुर्ची रक्षा' कायद्याच्या व मनोविकृत षंढ सरकारच्या विरोधात करण्यात येणाऱ्या या आंदोलनामध्ये बीड जिल्ह्यातील जनतेने लाखोंच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बीड शहर बचाव मंच च्या वतीने करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने जनसुरक्षा विधेयक क्र.३३ आणले आहे. हे विधेयक म्हणजे संविधानाने नागरिकांना परिच्छेद १९ नुसार दिलेल्या अधिकारांवर थेट हल्ला करणारे आहे. याचे नाव जरी जनसुरक्षा विधेयक असले तरी हे शासन सुरक्षा विधेयक आहे हे कुणीही सुज्ञ व्यक्ती हा कायदा वाचून सहज सांगू शकेल. हा कायदा नक्षलवादी किंवा अर्बन नक्षलवादी यांच्याकरिता बनवत आहोत असे जरी शासन सांगत असले तरी या संपूर्ण विधेयकामध्ये नक्षलवाद किंवा अर्बन नक्षलवाद हा शब्दसुद्धा नाही. या विधेयकातील सर्वात महत्वाची आणि हरकत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे या विधेयकाच्या सुरुवातीला आणि संपूर्ण विधेयकात वारंवार बेकायदेशीर कृत्य असा एक शब्द आहे. परंतु या बेकायदेशीर शब्दाची सविस्तर व्याख्या केली गेलेली नाही. बेकायदेशीर कृत्य कोण ठरवणार? तर शासन ठरवणार. मग बेकायदेशीर कृत्य म्हणजे शासनाला जे कृत्य बेकायदेशीर वाटेल ते कृत्य असाच त्याचा सरळ अर्थ होतो.



म्हणजे सरकारच्या धोरणांच्या/ योजनांच्या/ निर्णयांच्या विरोधात जी कुणी व्यक्ती भाष्य करेल, लिखाण करेल, किंवा संवैधानिक मार्गाने निषेध करेल त्यांच्या कृत्यालाही महाराष्ट्र शासन बेकायदेशीर कृत्य ठरवू शकते. तसेच शासन ज्या विचारांचे आहे त्या विचारांच्या विरोधी विचारांच्या व्यक्ती/ संघटनांना सुद्धा हे शासन बेकायदेशीर ठरवू शकते हे सत्य नाकारता येत नाही. आमच्या योजना/ धोरणे/निर्णय चुकीचे असूच शकत नाहीत अशीच कुठल्याही शासनाची भूमिका असणार आहेच. पण जर नागरिकांना त्या गोष्टी पटल्या नाहीत तर त्यांना त्याविरोधात बोलूही नये अशी भूमिकाच संविधानविरोधी आहे. त्यामुळे सर्वप्रथम बेकायदेशीर कृत्य म्हणजे कोणकोणते कृत्य हे अगदी स्पष्टपणे शासनाने जाहीर करणे गरजेचे होते पण शासनाने बेकायदेशीर शब्दाची व्याख्या अतिशय गुढपणे केली आहे.

या विधेयकामध्ये स्पष्टपणे उल्लेख असायला पाहिजे होता की सरकारच्या विरोधात सशस्त्र युद्ध पुकारणे, हिंसक मार्गाने सरकारविरोधी कारवाई करणे हा गुन्हा असेल. पण सरकारच्या धोरणाविरोधात, निर्णयांविरोधात, योजनांविरोधात मौखिक, लिखित आणि संवैधानिक मार्गाने आंदोलन/उपोषण/निषेध करणे हा गुन्हा असणार नाही आणि बेकादेशीर कृत्य असणार नाही. कारण सरकारच्या विरोधात बोलणे किंवा सरकारच्या ध्येयधोरणांविरोधात बोलणे, लिहिणे, निषेध करणे हा कोणत्याच प्रकारे गुन्हा होऊ शकत नाही. सरकारची जनतेसाठी लागू केली गेलेली किंवा सरकार आणणार असलेली ध्येय धोरणे/योजना ही जनतेसाठी चांगली की वाईट हे जनता ठरवेल ना? कोणतेच सरकार तर स्वतःच्या धोरणांना वाईट म्हणणार नाहीच. मग जर जनतेला सरकारच्या काही गोष्टी चुकीच्या वाटल्या, अन्यायकारक वाटल्या आणि जनतेनी रस्त्यावर येऊन त्याचा अहिंसक मार्गाने, शांततेच्या मार्गाने, संवैधानिक मार्गाने त्यास विरोध केला किंवा त्या अन्यायकारक गोष्टींविरोधात मीडिया-सोशल मीडियामध्ये लिहिलं तर त्यांच्यावर हा कायदा लागू होऊ नये. ही सर्व कृत्ये बेकायदेशीर कृत्यात येणार नाहीत असे स्पष्टपणे नमूद करावे. अर्बन नक्षलवादाविरोधात कायदा करताना अत्यंत महत्वाचा मुद्दा शासनाकडून दुर्लक्षित झालेला आहे. तो मुद्दा म्हणजे हिंदू-मुस्लिम असा जातीय विद्वेष पसरविणे, पसरविण्याचा प्रयत्न करणे हे बेकायदेशीर कृत्य ठरवून त्यांच्यावर हा कायदा लागू करणे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT